# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.10.2023** **वार –रविवार**

---

हवाई प्रात्यक्षिकं

भारतीय हवाई दल दिनानिमित्त आज पुण्यात डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीनं एरो मॉडेलिंगची प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या कार्यक्रमात रिमोट नियंत्रित, इलेक्ट्रिक मोटरच्या सहाय्याने उडणाऱ्या विमानांची प्रात्यक्षिकं दाखवण्यात आली.

'डार्क मॅटर

आकाशगंगेच्या निर्मितीमध्ये 'डार्क मॅटर' हा महत्वपूर्ण घटक असून, त्यावरील अभ्यासातून रहस्यमय उलगडा आगामी काळात होईल," असे मत अमेरिकेतील ड्यूक युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर डॉ. आशुतोष कोतवाल यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. कृत्रिम बुद्धिमतेच्या साहाय्याने 'डार्क मॅटर' वरील संशोधन अधिक प्रभावी होईल, असेही ते म्हणाले. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठासह विविध संस्थांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. अफाट ब्रह्मांड, सूर्य-तारे, आकाशगंगा, ग्रहमाला, निर्वात पोकळी, उल्का, डार्कमॅटर अशा विविध विषयांची माहिती कोतवाल यांनी सहज सोप्या पद्धतीने दिली. प्रत्येक गोष्टीचा चिकित्सक अभ्यास करताना स्वतःच्या डोळ्याने त्या गोष्टीची अनुभूती घेण्याची जिद्द आपल्या अंगी असायला हवी, असा सल्लाही कोतवाल यांनी दिला.

एमआयटी

2030 पर्यंत जगातील पाचवी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेनं भारताची वाटचाल सुरू आहे, या वाटचालीत विद्यार्थ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान द्यावं असं आवाहन इंडियन मर्चंट चेंबर्सचे अध्यक्ष समीर सोमय्या यांनी पुण्यात केलं. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हिर्सिटीनं

आयोजित केलेल्या संशोधन, नवोन्मेश आणि उद्योजकता या विषयावरील कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कर संकलन

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागानं थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात केली आहे.
वारंवार थकीत कर भरण्याचं आवाहन करूनही कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या 68 जणांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या. जप्तीपथक दारात जाताच 62 जणांनी तत्काळ धनादेश अथवा रोख पैसे भरले.

डायबिटिक

डायबिटिक असोसिएशन ऑफ इंडियाच्या पुणे शाखेची सुवर्णमहोत्सवी वार्षिक सर्वसाधारण सभा आज प्रसिद्ध अभिनेते डॉक्टर मोहन आगाशे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. मधुमेह निर्मूलनाच्या कार्यात मोलाचे योगदान देणारे डॉ. जगमोहन तळवलकर आणि डॉ. रमेश दामले यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. याशिवाय प्रसिद्ध एकपात्री कलाकार बंडा जोशी यांचा हास्य प्रभात हा कार्यक्रम देखील उपस्थितांची दाद मिळवून गेला.

भूलपरिषद

आरोग्य क्षेत्रात दररोज नवनवीन संशोधन आणि तंत्रज्ञान पुढं येत असून भूल तंत्रज्ञानामध्येही अमुलाग्र बदल झाले आहेत, भूलतज्ञांनी हे नवे बदल स्विकारत काम केल्यास आरोग्य क्षेत्रात आणखी प्रगती होईल,असं मत लष्करी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिक्षक मेजर जनरल डॉक्टर डी. विवेकानंद यांनी व्यक्त केलं. सोसायटी ऑफ अनेस्थेसियोलॉजीस्टच्या वतीनं "इसाकॉन महाराष्ट्र 2023 ' या चार दिवसांच्या राज्यस्तरीय भूल परिषदेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी मुख्य सल्लागार डॉक्टर आनंद भाटिया यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं.

टीबी

पुण्यात क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा असल्याचं समोर आलं आहे. पुणे महापालिकेत नोंदणी केलेले दोनशेच्या जवळपास क्षयरोगाचे रुग्ण आहेत. सध्या उपलब्ध निधीतून या रुग्णांना आवश्यक असलेली औषधं महिनाभर पुरवता येतील असं आरोग्य विभागाचे क्षयरोग निर्मूलन अधिकारी  प्रशांत बोठे यांनी सांगितलं.

गुन्हा

नुकत्याच साजऱ्या झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सव आणि ईद निमित्तानं काढण्यात आलेल्या मिरवणुकांमधून ध्वनी प्रदूषण केल्याप्रकरणी पुण्यात 80 गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. त्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांबरोबरच डीजे चालकांचाही समावेश आहे. या मिरवणुकांदरम्यान आवाजाची तीव्रता तपासण्यासाठी शहराच्या विविध भागात पोलीस कर्मचारी तैनात केले गेले होते.

बाजारसमिती

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून सत्तर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक घटल्याने जवळ जवळ सर्वच फळभाज्यांचे भाव कडाडले आहेत. पितृपंधरवड्यामुळे पालेभाज्यांना मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याने सर्वच पालेभाज्या दहा ते वीस टक्क्यांनी महागल्या आहेत. फळ बाजारात  मागणी आणि आवक स्थिर आहे. फुलांच्या दरात घसरण झाली आहे.

पुरस्कार

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त  दिला जाणारा 'सूर्यदत्त गांधीयन फिलॉसॉफी अवॉर्ड-2023 ' यंदा ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस यांना जाहीर करण्यात आला आहे. ज्येष्ठ गांधीवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या हस्ते उद्या हे पुरस्कार वितरण होणार आहे.

पुरस्कार

पिंपरी चिंचवडच्या अशोक सर्वांगीण विकास सोसायटी आणि अशोक सहकारी बॅंकचे संस्थापक डॉ. अशोक शिलवंत यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध पुरस्काराचं उद्या वितरण होणार आहे. यावेळी संपादक संजय आवटे यांना धम्मदीप पुरस्कार, माजी आमदार ॲड जयदेव गायकवाड यांना समाजभूषण पुरस्कार तर चंद्रकांत शेटे यांना विद्याभूषण पुरस्कार दिला जाणार आहे.

हवामान

पुणे आणि परिसरात आज आकाश मुख्यतः निरभ्र होतं. आज कमाल तापमान 34 तर किमान तापमान 20 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

---

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**